# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 23 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २३ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

गेल्या दीड वर्षात देशातल्या युवकांची दहा लाख सरकारी नोकर्यांमध्ये नियुक्ती झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे. रोजगार मेळाव्याअंतर्गत शासकीय कार्यालयं आणि विभागांमध्ये निवड झालेल्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना पंतप्रधानांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे नियुक्तीपत्र प्रदान केली, त्यावेळी ते बोलत होते. रोजगार मेळाव्यांमुळे युवकांचं सक्षमीकरण होत असून, त्यांची क्षमता आणि कौशल्याचा उपयोग करुन घेणं, ही सरकारची प्राथमिकता असल्याचं, पंतप्रधान म्हणाले. सरकारच्या नवनवीन योजना आणि धोरणांमुळे ग्रामीण भागात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून, कृषी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात तरुणांना रोजगार मिळाला आणि त्यांना त्यांच्या आवडीचं काम करण्याची संधी मिळाली, असं पंतप्रधान म्हणाले. मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत, स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया, डिजिटल इंडिया यासारख्या युवा केंद्रीय योजनांचा त्यांनी उल्लेख केला. केंद्र सरकारनं विधानसभा आणि लोकसभेत महिलांसाठी आरक्षण लागू केलं, आज आपला देश महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाकडे सातत्यानं वाटचाल करत असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

राज्यात नागपूर आणि पुणे इथं रोजगार मेळावा घेण्यात आला. नागपूर इथं आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २५७ जणांना नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात आली. शासकीय नोकऱ्यांमध्ये नवनियुक्तांनी आपल्या अंगभूत तसंच व्यक्तिगत कौशल्याचा विकास करून केवळ नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हावं, असं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं.

पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत झालेल्या रोजगार मेळाव्यात ५०० जणांना नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात आली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नाताळ उत्सवात सहभागी होणार आहेत. भारतीय कॅथोलिक बिशप्स परिषदेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ख्रिस्ती समाजाचे प्रमुख नेते, चर्चचे कार्डिनल्स आणि बिशप्स यांच्याशी ते चर्चा करतील. कॅथोलिक चर्चच्या मुख्यालयातला पंतप्रधानांचा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

****

माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांची जयंती आज राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरी होत आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दिल्लीत किसान घाट या चौधरी चरण सिंग यांच्या समाधीवर आदरांजली अर्पण केली.

राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाच्या अन्नसुरक्षा आणि समृद्धीमध्ये शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या योगदानाचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. खाद्य सुरक्षा सुनिश्चित करणं, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करणं आणि देशाच्या कृषी वारश्याच्या संरक्षणात शेतकऱ्यांच्या अमूल्य भूमिकेचं स्मरण यानिमित्त केलं जातं.

****

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण तसंच ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान आज एक दिवसाच्या पुणे दौऱ्यावर असून, राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रामांमध्ये ते सहभागी होणार आहेत. यावेळी जवळपास १३ लाख ३० हजार घरांचं हस्तांतरण त्यांच्या हस्ते होणार आहे.

दरम्यान, पुण्यातल्या गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या कृषी आर्थिक संशोधन केंद्राचा ७० व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम शिवराज सिंग चौहान यांच्या उपस्थितीत पार पडला.

****

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त, उद्या २४ डिसेंबरला ग्राहक व्यवहार विभाग, जागो ग्राहक ॲप, जागृती ॲप आणि जागृती डॅशबोर्ट लॉन्च करणार आहे. या ॲपमुळे फसवणुकीच्या प्रकरणाविरोधात कारवाई करणं केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधीकरणाला शक्य होणार आहे. जागो ग्राहक ॲपमुळे ग्राहकांना URLची माहिती मिळणं शक्य होईल, तसंच यातून काही धोका असल्यास ग्राहकाला सावधानतेचा इशारा दिला जाणार आहे. जागृती ऍपमुळे ग्राहकांना URL ची तक्रार करता येणार आहे.

****

अकोला जिल्ह्यात बार्शीटाकळी इथल्या मैत्री संघ महिला शेतकरी गटातल्या निमंत्रक आणि सदस्यांनी विद्रूपा नदीच्या पात्रामध्ये वनराई बंधारा तयार केला आहे. पाणी फाउंडेशनच्या वतीनं कान्हेरी सरप इथं सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत या गटानं सहभागी होत ही कामगिरी केली. कान्हेरी सरप हे गाव बार्शीटाकळी तालुक्यातलं लोकसंख्येने मोठं गाव असून, गावाच्या शिवारात नदी खोलीकरण, शेततळे, बांध बंदिस्ती केल्यानं गावच्या शिवारातल्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

****

पुण्यात वाघोली इथं भरधाव डंपरनं चिरडल्यामुळे फुटपाथवर झोपलेल्या तीन जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. डंपर चालकाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाल्याचं याबाबतच्या बातमीत म्हटलं आहे.

****

पाकिस्तान क्रिकेट मंडळानं २०२५ च्या आयसीसी चँपियन्स करंडक स्पर्धेतल्या भारताच्या सामन्यांसाठी, तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब आमिरात या देशाची निवड केली आहे. सुरक्षाविषयक कारणांमुळे भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे पाकिस्ताननं हा निर्णय जाहीर केला. त्यामुळे भारताचे सर्व सामने आता संयुक्त अरब आमिरातीमध्ये खेळले जाणार आहेत.

****